**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 28.09.2025** **वार- रविवार**

---

**DRDO**

देश संरक्षण सामग्री उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी उद्योग क्षेत्रानं संशोधनावर भर देण्याची आवश्यकता आहे असं प्रतिपादन संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजे DRDO चे अध्यक्ष समीर कामत यांनी केलं. DRDO यामध्ये आवश्यक ते सहाय्य करायला तयार आहे असं आश्वासन कामत यांनी दिलं. DRDO च्या वतीनं पुण्यात संरक्षण क्षेत्रातील उद्योगांसाठी काल एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कामत यांच्या हस्ते या कार्यक्रमच उद्घाटन करण्यात आलं. यामध्ये 150 उद्योग सहभागी झाले होते.

**सीबीजेप्रकल्प - अजितपवार**

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्यात येत्या एका वर्षात कॉम्प्रेस्ड बायोगॅस अर्थात सीबीजे प्रकल्प उभारणार असल्याचं उपमुख्यमंत्री आणि कारखान्याचे अध्यक्ष अजित पवार यांनी सांगितलं. 71 कोटी 74 लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पाला ऊस उत्पादक शेतकरी सभासदांनी बहुमताने मंजुरी दिली असल्याचं पवार म्हणाले. माळेगाव कारखान्याच्या 70व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते आज बोलत होते.

**एकसाथ श्रमदान**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ‘स्वच्छता ही सेवा’ या उपक्रमांतर्गत ‘एक तास-एक साथ श्रमदान’ हा उपक्रम घेण्यात आला. परिसरातील आठ ठिकाणी हे स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. यामध्ये एक हजार नागरिकांनी सहभाग नोंदवला. या मोहिमेतून 27शे किलो ओला कचरा आणि सुमारे चार टन राडारोडा गोळा करण्यात आला.

**स्वच्छता मोहीम**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “स्वच्छता ही सेवा” अभियानांतर्गत पिंपरीत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. पिंपरी मंडई परिसरात झालेल्या या मोहिमेमध्ये महापालिका आयुक्त शेखर सिंह सहभागी झाले होते. यावेळी साडे तीनशे नागरिकांनी स्वच्छतेची शपथ घेतली. या स्वच्छता मोहिमेत 762 किलो कचरा संकलित करण्यात आला.

**भगतसिंग जयंती**

शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात विविध संस्था संघटनांच्या वतीनं त्यांना अभिवादन करण्यात आलं. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**मुंबामहोत्सव**

पुण्यात सुरू असलेल्या मुंबा चित्रपट महोत्सवात आज झालेल्या चर्चासत्रात लघुपट निर्माते मयूर कुलकर्णी, लेखक हेमंत बेळे, दिग्दर्शक सुजय डहाके, अभिनेते गश्मीर महाजनी आणि केरळमधील चित्रपट निर्माते अर्जुन अजित यांनी भाग घेतला. मराठी चित्रपट सृष्टीत आशयसंपन्नता आहे परंतु कल्पनाशक्ती आणि दृश्यात्मकतेचा अभाव आहे, अशी खंत गश्मीर महाजनी यांनी यावेळी व्यक्त केली.

**नवदुर्गा**

नवरात्रोत्सवानिमित्त चित्रपट आणि नाट्य संस्थेच्या वतीनं 'वर्दीतील नवदुर्गा' हा अनोखा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पुण्यातील नऊ पोलीस ठाण्यांमधील कर्तव्यदक्ष महिला पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

**धम्मचक्र प्रवर्तन दिन**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येत्या 1 आणि 2 ऑक्टोबर रोजी पुणे रेल्वे स्थानकावरून पुणे-नागपूर-पुणे ही विशेष रेल्वे गाडी सोडण्यात येणार आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांची गर्दी होते. त्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने यंदा ही विशेष गाडी सोडण्याचं नियोजन केलं आहे.

**राष्ट्रसेविका समिती**

राष्ट्र सेविका समितीच्या वतीनं आज पुण्यात विविध ठिकाणी पथ संचलन करण्यात आलं. संभाजी भागाचं सघोष संचलन वारजे इथं झालं. या संचलनासाठी राष्ट्र सेविका समितिच्या अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनीला  सोवनी, पश्चिम प्रांत कार्यवाहिका शैला देशपांडे उपस्थित होत्या. खासदार मेधा कुलकर्णी या देखील संचलनात सहभागी झाल्या होत्या. नागरिकांनी ठीकठिकाणी उस्फूर्तपणे पथसंचलनाचं स्वागत केलं.

**नियुक्ती**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर प्रसेनजीत फडणवीस यांची राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रसेनजीत फडणवीस अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. 2017-2022 या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे ते सदस्य होते. आयआयटी मुंबईमधील संशोधक प्राध्यापक डॉ. अक्षय निकूंभ आणि संगमनेर महाविद्यालयाचे मनोहर गुजराथी यांचीही विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून निवड झाली आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून ऐंशी ट्रक फळभाज्यांची आवक झाली. भेंडी, कोबी, सिमला मिरचीसह अनेक फळभाज्यांचे भाव वाढले आहेत. तर पालेभाज्यांना पावसाचा फटका असून चांगल्या प्रतीच्या पालेभाज्या महागल्या आहेत. पावसामुळे हवेतील गारठा वाढल्याने फळबाजारात मागणी कमी झाली असल्याने दर घसरले आले आहेत. फुल बाजारालाही पावसाचा फटका बसला आहे; मात्र नवरात्र उत्सवामुळे फुलबाजार तेजीत आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण आहे, अधून मधून मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे, उद्याही शहरात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**